



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com LOK AARAMBH कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४ | अंक ३२५ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# मनोज जरांगे पाटील यांना नेमकं काय झालं? घरीच उपचार का सुरु? आता प्रकृती कशी?

## घरीच उपचार का सुरु?

डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे यांची काल रात्री तब्येत बिघडल्याने त्यांना घरीच सलाईन लावण्यात आले. तसेच त्यांच्या रक्ताचे नमुनेही घेण्यात आले आहे. ते नमुने अधिक तपासणीसाठी लॅबमध्ये पाठवण्यात आले आहेत. सध्या मनोज जरांगे पाटील यांना विश्रांतीची गरज आहे. कारण त्यांना खूप अशक्तपणा आला आहे. त्यामुळे त्यांना आराम करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. तसेच आज सकाळीही मनोज जरांगेंना सलाईन लावण्यात आले आहे. सध्या मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीत हळूहळू सुधारणा होत आहे.



विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. यंदाची विधानसभा निवडणूक महाविकासआघाडी विरुद्ध महायुती अशी होणार आहे. विधानसभा निवडणुकीत मराठा मतांचे राजकारण पाहायला मिळणार आहे. त्यातच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. मराठा आरक्षणासाठी झगडणारे नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालवली आहे. यामुळे त्यांना सलाईन लावण्यात आले आहे. आता मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीबद्दल एक मोठी अपडेट समोर आली आहे.

## मनोज जरांगेना नेमकं काय झालं?

**विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यापासून मनोज जरांगे पाटील हे मैदानात उतरले आहेत. त्यांनी काही ठिकाणी उमेदवार उभे केले आहेत. तर विविध पक्षाचे नेते, आमदार, खासदार मराठा मतांसाठी सातत्याने जरांगे पाटील यांची भेट घेत आहे. मनोज जरांगेना भेटण्यासाठी येणारे विविध पक्षांचे पदाधिकारी, आमदार, खासदार हे रात्री उशिरा येतात. त्यांची चर्चा ही उशिरापर्यंत सुरु असते. त्यामुळे जरांगे पाटील यांचे सतत जागरण होत आहे.**

**तर दुसरीकडे मनोज जरांगे पाटील हे सातत्यानं उपोषण करत असल्याने त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला आहे. यामुळे मनोज जरांगे पाटील यांना काल रात्रीपासून ताप, अशक्तपणाचा त्रास होत आहे. तापासोबत त्यांना इन्फेक्शन देखील झाले आहे. तापासोबत अंगदुखी, अशक्तपणा, घसादुखी आणि कफ झाला आहे.**

## परळी विधानसभा मतदारसंघात मुंडे, देशमुख, फड यांचा उमेदवारी अर्ज वैध

बीड : विधानसभा निवडणुकी करता उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आज छाननी होत आहे. परळी विधानसभा मतदारसंघात धनंजय मुंडे, महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख आणि अपक्ष उमेदवार राजेभाऊ फड यांचा अर्ज वैध ठरला आहे. महायुतीकडून धनंजय मुंडे, महाविकास आघाडी कडून राजेसाहेब देशमुख, तर शरद पवार गटा-कडून उमेदवारी न मिळाल्यामुळे राजेभाऊ फड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या तिघांचाही अर्ज वैध ठरला आहे. दरम्यान परळी विधानसभा मतदारसंघातून करुणा शर्मा यांनी देखील उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र त्यांचा अर्ज बाद





झाल्याने अवैध ठरविण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघातून १७६ इच्छुक उमेदवारांनी २६६ उमेदवारी अर्ज दाखल केले. आतापर्यंत जिल्ह्यातून ४०९ इच्छुक उमेदवारांनी तब्बल ५६६ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. बीड व माजलगाव मतदार संघा-तून सर्वाधिक १३८ उमदेवारी अर्ज दाखल झाले आहेत.

## दोन हजाराची लाच घेताना तलाठी एसीबीने पकडला

बीड : भोगवटादार प्रमाणपत्रासाठी पैशाची मागणी करणाऱ्या लाचखोर तलाठ्यास दोन हजार रुपये घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. मदन लिंबाजी वनवे वय ३५ वर्ष रा. गायकवाड यांचे घर, पंढरी, धानोरा रोड बीड असे लाचखोर तलाठ्याचे नाव आहे. तक्रारदाराच्या मित्राने मौजे तळेगाव येथे गट क्रमांक १९२ मधील मालमत्ता क्रमांक४३०९ चे मुख्त्यारपत्र तयार करून दिले होते. सदर प्लॉटची ग्रामीण गुंठेवारी करण्यासाठी भोगवटादार प्रमाणपत्राची गरज होती. प्रमाणपत्र देण्यासाठी तलाठी लोकसेवक मदन वनवे याने लाचेची मागणी केली. या प्रकरणाची तक्रार एसीबी कडे करण्यात आल्यानंतर पंचा समक्ष तलाठी वनवे याने तीन हजार रुपये मागितले. मात्र तडजोडी अंती दोन हजार रुपये घेण्यास तलाठी तयार झाला. दरम्यान लाचे चे पैसे स्वीकारताना मदन वनवे यास त्याच्या खाजगी कार्यालयात लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने



रंगेहात पकडले. याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई बीड एसीबीचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शेख युनूस, किरण बगाटे, पोलीस अंमलदार, भरत गारदे, हनुमंत गोरे, संतोष राठोड, अविनाश गवळी. गणेश मेहेत्रे यांनी केली.

## धुळे-सोलापूर बसचा अपघात पंचवीस जण जखमी

दैनिक लोकआरंभ//

बीड : तुळजापूरहून धुळ्याकडे जात असलेली बस धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पारगाव (ता. वाशी जि. उस्मानाबाद जवळ असलेल्या जुन्या टोलनाक्या जवळील बायपास जवळ वाहकाच नियंत्रण सुटल्यामुळे बाजूच्या शेतात जाऊन पलटी झाली. या दुर्घटनेत वीस ते पंचवीस जण जखमी झाले आहेत. जखमींना पारगावच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आहे. तुळजापूरवरून धुळ्याकडे जात असलेली बस क्र. एम एच २० बी एल १८९५ ही सकाळी साडेअकराच्या सुमारास पारगाव जवळ आली असता बस वरील चालकाचे नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्यामुळे बस शेतात जाऊन पलटी झाली. दरम्यान पारगाव थांबा बसला असला तरी तो थांबा न घेता बायपास वरूनच बस घेऊन जात असल्यास मुळे आशा अनेक दुर्घटना या ठिकाणी घडलेल्या आहेत. ही दुर्घटना देखील पारगाव शहरात बस न गेल्यामुळे घडला असल्याचं नागरिकांचे म्हणणं आहे. या दुर्घटनेत वीस ते पंचवीस जण जखमी झाले असून प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मदत कार्य सुरू केले. दुर्घटनेतील जखमींना पारगाव मधील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## बीड विधानसभेसाठी ज्योती मेटे यांनी शिवसंग्राम पक्षाकडून भरला उमेदवारी अर्ज

बीड : राज्यात निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक राजकीय घडामोडी घडताना दिसत आहेत. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. आठवडाभरापूर्वी विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला होता. मात्र आज त्यांनी बंडखोरी करत शिवसंग्राम पक्षाकडून बीड विधानसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून या ठिकाणी विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना पुन्हा तिकीट देण्यात आले आहे. त्यामुळे या ठिकाणी संदीप क्षीरसागर विरुद्ध ज्योती मेटे असा सामना होणार आहे



# नाशिकमध्ये झोपडपट्टीत लाखो रुपयांचं पैशांच घबाड,

## कसारा घाटात अडवलेल्या वाहनात २ कोटी, तर दिंडोशीतही लाखो रुपये

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या काळात निवडणुकीत मतदारांना वळवण्यासाठी पैशांचं आमिष दिलं जातं. त्यामुळे अशाप्रकारचं कृत्य करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाते. पोलिसांकडून राज्यभरात अशाप्रकारची कारवाई सुरु आहे. या कारवाईतून आतापर्यंत कोट्यवधी रुपये जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांकडून संबंधित प्रकरणाचा सखोल तपास सुरु आहे. त्या पैशांचा कोणत्या पक्षाशी किंवा पक्षाच्या उमेदवारांसोबत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध आहे का? याचा तपास पोलिसांकडून केला जातोय. अशाप्रकारच्या कारवाईत राज्यात मुंबईतील दिंडोशी, नाशिक, शहापूर अशा वेगवेगळ्या ठिकाणी पैशांचं घबाड सापडलं आहे. नाशिकमध्ये झोपडपट्टीत लाखो रुपयांचं पैशांचं घबाड सापडलं आहे.

**नाशिकमध्ये झोपडपट्टीत सापडले पैशांचं घबाड**

नाशिकच्या सातपूर परिसरातील नाकाबंदी दरम्यान 20 लाख 50 हजार तर उपनगर परिसरातील घर झडतीत 11 लाख रुपये सापडले. नाशिकच्या उपनगर परिसरात असलेल्या भालेराव मळा परिसरातील झोपडपट्टीत पैसे सापडल्याने खळबळ उडाली आहे. घर झडतीत सापडलेल्या पैशांतून 21 वर्षीय तरुणाला आणि नाकाबंदी दरम्यान कारमध्ये सापडलेल्या कारचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या दोघांची किंमत एकूण 31 लाख इतकी आहे. पोलिसांना सापडलेल्या पैशांचा राजकीय व्यक्ती किंवा पक्षाशी संबंध आहे का? याचा



तपास पोलिसांकडून सुरू आहे.

**दिंडोशीत लाखो रुपये जप्त**

मुंबई पश्चिम उपनगरातील दिंडोशी परिसरात 7,80,440 रुपये कॅश जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी 7 जणांना पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी दुचाकीवरून प्रवास करत असताना त्यांच्याकडे पैशांची बॅग होती. आचारसंहिता पथकाची दिंडोशी परिसरात नाकाबंदी सुरू असताना त्यांनी एक बाईक अडवली. यानंतर पोलिसांनी दुचाकीस्वारांच्या बॅगेची तपासणी केली. यावेळी बॅगेत पैसे आढळून आले. पोलिसांकडून या प्रकरणी पुढील कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे दिंडोशी पोलिसांना आणखी एका दुचाकीस्वाराकडे साडेसहा लाख रुपयांची कॅश मिळाली. दिंडोशी पोलिसांना रूटिंग चेकिंग दरम्यान 6.5 लाखांची रोकड सापडली. मिळालेल्या माहितीनुसार, दिंडोशी येथे पोलिसांच्या तपासणीदरम्यान दुचाकीवरून आलेल्या व्यक्तीकडून साडेसहा लाख रुपये जप्त करण्यात आले. ही रक्कम ज्वेलर्सची असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. तरीही दिंडोशी पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.

**शहापूरमध्ये सापडली 2 कोटींची रोख रक्कम**

मुंबई-नाशिक महामार्गावर कसारा घाटातील चिंतामण वाडी पोलीस चौकीजवळ स्थानिक पोलिसांनी पकडले. रक्कम मोजण्याचे काम सुरू आहे. शहापूर तालुक्यातील मुंबई-नाशिक महामार्गावर कसारा घाटाच्या पायथ्याशी असलेल्या चिंतामण पोलीस चौकी जवळ स्थानिक पोलीस कर्मचाऱ्यांकडून वाहनांची तपासणी सुरु असताना MH 11 BV 9708 गाडीत रोक रक्कम आढळून आली. वाहन ताब्यात घेऊन भरारी पथकांकडून पैसे मोजण्याचे काम सुरू आहे. संबंधित वाहन नाशिकहून मुंबईच्या दिशेने जात होती. प्राथमिक माहितीनुसार, गाडीत 2 कोटी रुपयांची रक्कम आढळली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# सुगंधी राजस उटणे

दीपावली म्हणजे आनंदाचा, सुखाचा, दिव्यांचा आणि सर्वात महत्वाचे कुटुंबाचा सण. गोड फराळ, फटाके, रोषणाई, कंदील, दिवे याच सोबत घराघरात सुगंध असतो तो उटण्याचा. दिवाळीची सुरुवातच मुळी होते ती पहाटेच्या अभ्यंग स्नानाने. यासाठी आपण बाजारातून तयार उटणे विकत आणतो आणि वापरतो. लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना हे उटणे वापरले जाते. पण आपण आणलेले उटणे हे खरोखरच चांगल्या दर्जाचे आहे का ? याची पडताळणी आपण करत नाही. त्यामुळे त्याच्या वापरणे उपयोग होण्या ऐवजी बरेचदा त्रास होतो. त्यामुळे हल्ली काही लोक त्याचा वापर करण्याचे टाळू लागले आहेत. आणि सुगंधी साबण आणून वापरू लागले आहेत.

खरं तर अभ्यंग स्नान हा आपल्या परंपरेतील एक पवित्र संस्कार आहे. पूर्वी घराघरांतून जसा फराळ बनवला जातो त्याप्रमाणे उटणे देखील बनवले जात असे. फक्त दिवाळी पुरतेच नाही तर उटण्याचा वापर रोजच्या आयुष्यात अंघोळीसाठी केला जात असे. गरिबापासून राजापर्यंत सर्वजण त्यांचा वापर करत. शरीराचे बाह्य शुध्दीकरण, त्वचा विकारांपासून संरक्षण या मूळ उद्देशाने याचा वापर केला जाई. बदलत्या काळानुसार याचा विसर पडू लागला. आणि विविध साबणांनी त्याची जागा घेण्याचे काम सुरू केले. निसर्ग आणि आयुर्वेदाचे वरदान लाभलेल्या आपल्या भूमीत बदलत्या अधूनिकीकरणामुळे ह्या गोष्टी मागे पडू लागल्या.

निसर्गाने दिलेल्या मौल्यवान वनस्पतीचे ज्ञान बरेचदा ऋषीमुनींना माहीत असे. राजाश्रय मिळवण्यासाठी अनेकदा ही माहिती गोपनीय ठेवली जात. त्यामुळे सामान्य लोकांना याची माहिती कमी प्रमाणात होती. जंगलातून योग्य वनस्पती शोधून त्या वेचून आणणे, त्यांना उन्हात सुकवणे, कापणे, खलबत्त्यात कुटून बारीक पावडर करणे, चाळून घेणे अशा प्रदीर्घ प्रक्रियेतून हे उटणे तयार केले जात असे. त्यासाठी लागणारी मेहनत व कालावधी मोठा असल्याने, तसेच आपले वर्चस्व राखून ठेवण्याहेतू ही माहिती सहजासहजी दुसऱ्याला दिली जात नसे. पण आज जशी जगाने प्रगती केली आहे तशीच आयुर्वेदाने बदलत्या काळाचा, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून याच अवघड गोष्टी देखील सोप्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच उटण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वनऔषधी आज पावडर स्वरूपात आयुर्वेदिक औषधालयात सहज विकत मिळतात.

निसर्गातील हेच एक उपयुक्त गुपित आज मी तुम्हाला सांगणार आहे. परंपरेगत वापरले जाणारे सुगंधी उटणे कसे तयार करावे ? याची पूर्ण माहिती या लेखात दिली आहे.

राजस सुगंधी उटणे - यासाठी लागणारे जिन्नस खालील प्रमाणे घ्यावेत -

1 - नागर मोथा - 200 ग्रॅम
2 - गव्हला काचोरा - 200 ग्रॅम
3 - कापूर काचारी - 100 ग्रॅम
4 - बावची - 50 ग्रॅम
5 - चंदन पावडर - 50 ग्रॅम
6 - अनंत मूळ - 50 ग्रॅम
7 - मुलतानी माती 50 ग्रॅम
8 - लोध्र - 50 ग्रॅम
9 - वाळा - 10 ग्रॅम
10 - आंबेहळद 10 ग्रॅम

या सर्व वनऔषधी पावडर स्वरूपात आयुर्वेदिक दुकानातून आणाव्यात. एक एक करून सर्व औषधी बारीक चाळणीने चाळून एकत्र कराव्यात. हे झाले आपले सुगंधी राजस उटणे तयार. या तयार मिश्रणाला हवाबंद डब्यात भरून वर्षभर ठेवता येते.

वापर कसा करावा -
0 ते 5 वर्षाच्या मुलांसाठी- 1 चमचा उटणे पावडर + 1 चमचा मसूर डाळीचे पीठ+ 1 चमचा मध + अर्धा चमचा साजूक तूप +दूध असे मिश्रण तयार करून वापरावे.

5 ते 12 वर्षापर्यंत 1 चमचा उटणे पावडर + 1 चमचा मध + 2 चमचे मसूर डाळीचे पीठ + 1 चमचा साजूक तूप + 1 चमचा रोगन बदाम तेल हे मिश्रण दुधात किंवा पाण्यात मिसळून लावावे.

13 ते 20 वर्षापर्यंत - 2 चमचे उटणे पावडर + 2 चमचे मसूर डाळीचे किंवा चना डाळीचे पीठ + 1 चमचा मध + 1 चमचा रोगन बदाम तेल असे मिश्रण कच्या दुधातून वापरावे. त्वचा अधिक तेलकट असल्यास, पिंपल असल्यास पाण्यात मिसळून वापरावे. रोगन बदाम तेल मिसळू नये. त्या ऐवजी अर्धा चमचा निम पावडर मिसळून वापरावे.

20 वर्षापासून पुढे सर्वांनी 2 चमचे उटणे पावडर + 2 चमचे मसूर डाळीचे पीठ + 1 चमचा गुलाब पावडर + 1 चमचा रोगन बदाम तेल + 1 चमचा मध असे मिश्रण करून वापरावे.

यातील कुठल्याही औषधीची एलर्जी असल्यास तिचा वापर टाळावा. हे वापरून पुन्हा साबण लावण्याची आवश्यकता नाही. जरी वापरला तरी हरकत नाही.

दिलेल्या प्रमाणात उटण्याचा वापर योग्य पद्धतीने केला तर त्यामुळे त्वचा विकार बरे होतात. घामोळ्या, घामाची दुर्गंधी, उन्हामुळे येणारे काळेपणा (सनबर्न किंवा टॅनिंग), तारुण्य पिठीका यावर उत्तम प्रभावी असे हे उटणे आहे.

नियमित हे उटणे वापरल्याने त्वचा सुंदर, तेजस्वी आणि नितळ होते. चला तर मग या दिवाळीत आपण तयार केलेले राजस उटणे वापरून ही दिवाळी सुगंधी आणि आनंदी करूया.....

सर्व वाचकांना दीपावलीच्या मंगलमय, आनंददायी आणि सुगंधी शुभेच्छा...

डॉ. राजश्री नीरज बोहरा
निसर्गोपचार तज्ञ
संपर्क - 8779826643

# संभाजी ब्रिगेड चे अधिकृत उमेदवार विजय आत्माराम दराडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



संभाजी ब्रिगेड चे अध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी पुत्र विजय दराडे यांना संभाजी ब्रिगेड कडून उमेदवारी जाहीर करण्यात आली. संभाजी ब्रिगेड मराठा आरक्षण,ओबीसी आरक्षण, दलीत ,मुस्लिम सह सर्व जाती धर्मा साठी तसेच शेतकरी बांधव यांच्या साठी मोठ्या प्रमाणत काम केलेलं असून माजलगाव मतदार संघात पंधरा हजार च्या जवळपास मतदार हा संभाजी ब्रिगेड चां बांधील मतदार असून विजयाकडे वाटचाल करण्यासाठी मनोज जरांगे यांनी पाठिंबा देण्याची गरज असल्याचे दिसून येते. माजलगाव मतदार संघात सर्व कारखाना दार यांची घराणेशाही संपत नसून शेतकऱ्यांचा विचार कुणी करत नाही, सर्व सामान्य नागरिकांचे अनेक काम करतांना पैसा दिल्या शिवाय काम होत नाही भ्रष्टाचार वाढला आहे, जन सामान्य नागरिक या उमेदवार यांना कंटाळला आहे. सद्याच वातावरण पाहता संभाजी ब्रिगेड ला पोषक वातावरण दिसत असून जन नागरिकांनी संभाजी ब्रिगेड ला निवडून द्यावे असे आव्हाहन संभाजी ब्रिगेड चे उमेदवार विजय दराडे यांनी केले आहे. संभाजी ब्रिगेड अध्यक्ष मनोज आखरे,संपर्क प्रमुख सुदर्शन तारक प्रचार व नियोजन देऊन उमेदवार विजयी होण्या साठी साम,दाम ,दंड भेद सर्व वापर करणार असल्याचे समजले

# राष्ट्रसंत श्री पाचलेगावकर महाराज

आश्विन वद्य चतुर्दशी यालाच नरक चतुर्दशी असे म्हणतात. याच दिवशी जगद्गु भगवान श्‌ गु रीकृ ष्णाने नरकासुराचा वध के ला. या दिवसापासून खऱ्या अर्थाने दिवाळीला सुरुवात होते. बऱ्याच भागात नरकचतुर्दशीला दिवाळीचे पहिले पाणी असे संबोधले जाते. या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करण्याची प्रथा रूढ आहे. नरक चतुर्दशीच्या दिवशी सकाळी लवकर उठून सुगंधी तेल व उटणे लावले जाते. अं घोळीपूर्वी ओवाळण्याची पद्धत आहे. या दिवशीच्या स्नानाला 'अभ्यंगस्नान' असे म्हणतात. अशाप्रकारे नरक चतुर्दशीचे बहु अर्थाने महत्त्व आपल्या भारतीय संस्कृतीत आहे. याच नरक चतुर्दशीच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्राच्या संत भूमीत राष्ट्रसंत श्री संचारेश्वर महाराज यांचा जन्म मराठवाडा विभागात परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातील पाचलेगाव येथे झाला. श्रीक्षेत्र पाचलेगाव येथील राजाराम पंत व कृ ष्णाई यांच्या पोटी तेजस्वी दिव्य बालकाचा जन्म झाला. सद्गुच्यु या जन्मापूर्वीच श्री संचारेश्वर महाराजांचे गुरु नयकोटवाडी येथील थोर संत, महंत श्री माधवाश्रम स्वामी महाराज यांनी महाराजांच्या जन्मा बद्दल भविष्यवाणी पाचलेगाव येथे येऊन के ली. भविष्यवाणी करताना ते राजाराम पंत व कृ ष्णाई यांना म्हणाले " तुमच्या पोटी एका तेजस्वी बालकाची जन्म होईल. हा बालक सर्वसामान्यांप्रमाणे संसारात रमणार नाही. तर तो आपले संपूर्णजीवन स्व धर्मासाठी व स्व राष्ट्रासाठी अर्पण करेल. संपूर्ण आयुष्य जनसेवा, देशसेवा आणि समाजसेवा करेल." प्रत्यक्षात तसेच घडले श्री संचारेश्वर महाराजांच्या जन्मानंतर घरात आनंदी आनंद झाला. बालवयातच महाराजांनी अनेक लीला के ल्या. लहानपणापासूनच सर्वत्र भ्रमण करणे, संचार करणे महाराजांना आवडायचे. अगदी लहानपणापासून सर्व समाजाला त्यांनी भूतदया याची शिकवण दिली. प्राणीमात्रांवर दया करा. ते लहानपणापासूनच 'सर्पमित्र' होते. परिसरातील हजारो सापांना त्यांनी जंगलामध्ये, वनामध्ये नेऊन सोडले. ते स्वतः प्रत्यक्ष गळ्यात सर्पहार परिधान करत. साप हा शेतकऱ्याचा मित्र आहे. त्याला मारू नका. अशी शिकवण महाराजांनी सर्वसामान्यांना दिली. महाराज सर्वसामान्यांप्रमाणे शाळेमध्ये शिकण्यासाठी गेले; परंतु तेथेही त्यांचे अद्‌त व भु र्तन पाहून अनेक जण आश्चर्यचकित झाले. ते अभ्यासात खूप हुशार होते. एकपाठी असल्याने महाराजांचा अभ्यास लवकर व्हायचा; उरलेल्या वेळात ते देवाचे नामस्मरण करत. आपण सर्व शिवाचे दास आहोत. सर्वांनी देवाचे नामस्मरण के ले पाहिजे असे ते सांगायचे. पुढेपुढे शिक्षकांना महाराजांचे हे वर्तन आवडत नव्हते. त्यांनी त्यांना शाळेत येण्यापेक्षा मंदिरात जायला सांगितले. आणि महाराजांची शाळा थांबली पण शिक्षण चालूच राहिले. भविष्यात ते फार मोठे अमोघ वक्ते म्हणून उदयास आले. महाराष्ट्रातच नाही तर देशभरामध्ये महाराजांची अनेक प्रवचने, भाषणे झाली. त्यांच्या प्रवचनांना, भाषणांना खूप मोठी गर्दी व्हायची. प्रवचनांमधून महाराजांनी लोकांना जागृत के ले. अं धश्रद्धा निर्मूलन करण्याचे फार मोठे काम महाराजांनी के ले. सर्व लोक महाराजांना बाबा म्हणत. तरीसुद्धा त्यांनी बुवाबाजी, भोंदगिू री यावर सतत घणाघात के ला. "श्रद्धा ठे वा.....परंतु अं धश्रद्धा ठे वू नका.... अनिष्ट चालीरीती पाळू नका. खरा देव माणसात आहे. माणसातला देव ओळखायला शिका. मानव सेवा, जनसेवा हीच माधव सेवा, ईश्वर सेवा आहे." हाच संदेश महाराजांनी सदोदित दिला. महाराज कधीही कोणत्याही प्रकारचा जातिभेद मानत नव्हते. संपूर्ण आयुष्यात त्यांनी कधीच जात-पात-धर्म अशा प्रकारचा भेद मानला नाही. जात-पात-धर्म यापेक्षा देश मोठा असतो. असा त्यांचा विचार होता. हिंद धू र्मातील अनिष्ट चालीरीती त्यांना मान्य नव्हत्या याउलट महाराज स्वतः समष्टी धर्माचे पुरस्कर्तेहोते. लहानपणापासून अनेक महान कार्य महाराजांनी के ली. जेथे ज्ञान विज्ञान संजीव होते जिथे योग विद्येस सामर्थ्य येते जिथे मानवाला मिळे मोक्ष गाथा तुझ्या पायरीशी सदा नम्र माथा 1926 सालच्या डिसेंबर महिन्यात कळमनुरी या छोट्या गावात महाराजांनी संहिता स्वाहाकाराचे आयोजन के ले. या स्वाहाकाराला श्री संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज, संत दासगणू महाराज आणि करवीर पीठाचे शंकराचार्य श्री विद्याशंकर भारती म्हणजे डॉक्टर कुर्तकोटी या व्यक्तींची उपस्थिती होती. अनेक कीर्तनकार, प्रवचनकार,शास्त्री, पुराणिक, पंडित यांच्यासह समाजाच्या सर्वस्तरातील दीड लाखांचा समुदाय त्याठिकाणी जमला होता. एवढा मोठा विशाल जनसागर एका विशिष्ट ध्येयाने एकत्र आला होता. छोट्या महाराजांची सोपी पण सर्वांना धीर देणारी व आपल्याला काय करायचे ते नीट समजून सांगणारी वाणी आणि त्यांची धर्मनिष्ठा बघून सगळे जण भारावून गेले. याचा शंकराचार्यांना खूप आनंद झाला. हे पाहून त्यांनी स्वतःच्या अं गावरील शाल श्री संचारेश्वर महाराज यांच्या अं गावर घातली. त्यांना 'धर्मभास्कर' ही पदवी बहाल के ली. अशा प्रकारचे अनेक धार्मिक कार्यक्रम महाराजांनी संपूर्ण देशभर राबवले. कळमनुरी च्या स्वाहाकार यज्ञापासून श्री संचारेश्वर महाराज सर्वत्र प्रसिद्ध झाले. लोक त्यांना धर्मभास्कर श्री संचारेश्वर महाराज म्हणू लागले. धार्मिक कार्यासोबत त्यांनी अनेक सामाजिक कार्य हाती घेतले. " 'श्रमदान हे महादान आहे'. श्रमाची कोणालाही लाज वाटता कामा नये. प्रत्येकाने परमेश्वराची पूजा आणि अनुष्ठान म्हणून श्रमदान करावे. राम आणि काम हे दोन्ही एकच आहेत. त्यामुळे मानव सेवा हीच माधव सेवा आहे. या भावनेतून सर्वांमध्येश्रमाची आवड निर्माण झाली पाहिजे." असे महाराज म्हणायचे. श्रमदानाच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्य महाराजांनी के ले. अनेक रस्ते तयार के ले. अनेक ठिकाणी बंधारे बांधले. अनेक पुलांची निर्मिती के ली. श्रमदानासाठी महाराज स्वतः पुढाकार घेत. श्रमदानाची सुरुवात महाराज स्वतः करायचे. श्रमदान यज्ञाचे व्रत महाराजांनी आयुष्यभर चालू ठे वले. पुढे पंजाबात घेतलेल्या श्रमदान यज्ञ तर इतका मोठा होता की; हे श्रमदानाचे कार्य बघून प्रत्येक जण आश्चर्यचकित झाला. 'बोले तैसा चाले..... त्याची वंदावी पाऊले..." या उक्तीवर महाराजांचा प्रचंड विश्वास होता. 'आधी के ले मग सांगितले' या तत्त्वानुसार प्रत्येक सामाजिक कार्यात महाराज स्वतः हिरीरीने भाग घेत. प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात महाराज रक्तदाना सारखे महत्त्वाचे सामाजिक काम सुद्धा करत. रक्तदान हे फार मोठे दान आहे आणि पुण्याचे काम आहे असे महाराज लोकांना सांगत. त्यामुळे माझ्या कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात ही रक्तदानाने होते. सगळ्यात महत्वाचे म्हणजे आपल्या संपूर्ण आयुष्यात महाराजांनी कधीही ही कोणत्याच प्रकारचा भेदभाव के ला नाही. 'जातीभेद हा आपल्या धर्माला लागलेला कलंक आहे.' तो नष्ट झाला पाहिजे. जातीभेद निर्मूलनाचे अत्यंत पवित्र कार्य महाराजांनी हाती घेतले. विनायक दामोदर सावरकरांनी पतित-पावन मंदिराची स्थापना के ली या कार्यातही महाराजांची मोलाची साथ सावरकरांना लाभली. महाराजांचे जातीभेद निर्मूलनाचे हे कार्य बघून कालांतराने महाराष्ट्र शासनाने राष्ट्रसंत श्री पाचलेगावकर महाराज यांना 'दलित मित्र' हा पुरस्कार देऊन महाराजांचा यथोचित गौरव के ला. महाराजांच्या समाजसेवेच्या कार्यासोबत अं धश्रद्धा निर्मूलनाचे फार मोठे कार्य महाराजांनी के ले. ते उत्कृष्ट मानसोपचार तज्ञ होते. लोकांच्या अनेक प्रकारच्या मानसिक बाधा, आजार महाराजांनी दर के ल्‌ ू या. ते सर्वसामान्य जनतेला नेहमी सांगत "चमत्कार ही चोरी आहे. कोणाच्याही चमत्कारावर विश्वास ठे वू नका." त्याच बरोबर महाराज ठिकठिकाणी 'लाहाडी' चे प्रयोग करून दाखवत. 1928 साली पुण्यातील डेक्कन कॉलेजच्या पटांगणावर महाराजांनी लाहाडीचा प्रयोग आयोजित के ला. यासाठी साहित्यसम्राट न चि के ळकर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या प्रचंड मोठ्या मैदानावर खोल आणि लांबलचक चर खोदण्यात आला त्यावर लाकडे पेटवून अग्नी प्रदीप्त करण्यात आला. जमलेल्या स्त्रियांनी अग्नीची पूजा के ली आणि नंतर महाराज व त्यांच्या पाठोपाठ हजारो लोक त्या पेटलेल्या निखाऱ्यावरून चालत गेले. पण कु णालाही भाजले नाही. हा प्रयोग पाहण्यासाठी असे कसे शक्य आहे....? या भावनेतून आलेले सर्व लोक, बातमीदार हे दृश्य पाहून अवाक झाले. या सगळ्या कार्यासोबत महाराजांनी के लेले देशसेवेचे कार्य फार मोठे आहे.

्री. मयूर मधुकरराव जोशी

# मनोज वाघमारे यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी निवड..

## बाजीराव दादा चव्हाण यांनी रुग्णसेवेला दिला योग्य न्याय..

बीड प्रतिनिधी - आपल्या सामाजिक व रुग्णसेवेतील कार्यामुळे एक आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे बीड येथे हॉस्पिटल मधील कोणाच्याही अडचणीला कधीही धावून जाणारे, अनेक गरजू रुग्णांच्या हाकेला ओ देणारे मनोज वाघमारे यांची वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. श्री.एकनाथ शिंदे साहेब व मा. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे साहेब,धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवासेना मराठवाडा निरीक्षक मा.बाजीराव दादा चव्हाण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्याचे कक्षप्रमुख मा.राम राऊत साहेब व मुख्यमंत्री सहायता निधी कक्षप्रमुख मंगेशजी चिवटे साहेब यांच्या आदेशावरून व बीड जिल्हाप्रमुख महादेवजी मातकर यांच्या सूचनेनुसार निवड करण्यात आली. यावेळी धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा सेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव दादा चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश भाऊ



जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अजय सुरवसे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख शरद झोडगे, शहर प्रमुख कपील जोगदंड आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवडीमुळे मनोज वाघमारे यांचे जिल्ह्यात सर्वत्र स्वागत व शुभेच्छा येत आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# योगेश क्षीरसागर प्रवेशाचा ओघ

# ठिकठिकाणी त्यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांची गर्दी

बीड (प्रतिनिधी)
दि.३० : उमेदवारी अर्ज वैध ठरलेले महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. ठिकठिकाणी नागरिकांनी त्यांच्या उमेदवारीचे स्वागत केले असून ते ताकदीने कामाला लागले आहेत. त्यांच्याकडे इतर पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे प्रवेश सुरू झाले आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांसमवेत बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नारायण गडावरील नगद नारायण महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच, शहरातील कंकालेश्वर मंदिर, शहेंशावली दर्गा, खंडेश्वरी मंदिर, राजुरी न. येथील नवगण गणपती या ग्रामदैवताचे दर्शन घेतले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महाराणा प्रताप, महात्मा बसवेश्वर, संत गाडगे बाबा, क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राजमाता जिजाऊ, वसंतराव नाईक पुतळा भगवान बाबा चौक, वीर सावरकर, यशवंतराव चव्हाण, स्व. द्वारकादास मंत्री या महापुरुषांसह छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण परिसरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी ठिकठिकाणी त्यांच्या स्वागतासाठी नागरिकांसह कार्यकर्त्यांची गर्दी दिसून आली.



## माजी सरपंच श्रीराम डुकरे, कल्याण गाडेकर यांचा प्रवेश

बीड तालुक्यातील पिंपळगाव (मजरा) येथील माजी सरपंच श्रीराम डुकरे, कल्याण गाडेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी त्यांचे स्वागत करत पक्ष संघटन वाढीसाठी शुभेच्छा दिल्या.

## प्रा.आ. केंद्र सुलेमान देवळा येथील नवीन पाणी फिल्टर कर्मचाऱ्यांनी केले लंपास

( कडा प्रतिनिधी ) बीड जिल्ह्यातील सर्वात मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून अस्तित्वात असणारे, आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील शासकीय कोट्यातून खरेदी केलेले पाणी फिल्टर सह अनेक वस्तू कर्मचारी परस्पर लंपास करीत आहेत. अशी लेखी तक्रार आज सुलेमान देवळा गावातील समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी आरोग्य विभागाकडे डॉक्टर, शुभांगी पैठने व डॉक्टर शेख मॅडम यांच्याकडे केली आहे . सविस्तर माहिती अशी की, सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थानिक आरोग्य समितीच्या निधीतून, कागदपत्रे अनेक वस्तू खरेदी केला असून, प्रथम दर्शनी कोणतेही वस्तू आज आरोग्य केंद्रात नाहीत. पाणी फिल्टर विषयी चौकशी केली असता अशी माहिती भेटली की, सदर पाणी फिल्टर दवाखान्यातील एका कर्मचाऱ्यांच्या घरी नेऊन बसवण्यात आले आहे. डॉक्टर पैठणे मॅडम व कर्मचारी क्लार्क/सुपरवायझर सानप यांच्या संगमताने, दवाखान्यातील अनेक शासकीय औषधे , खांट, गादी, व अन्य औषधाची बाहेर विकी होते का? हा सुद्धा संशय व्यक्त होत आहे. सदर दोन्ही कर्मचाऱ्याची अनुपस्थिती आसते. व दोन्ही अधिकाऱ्यांचा संगमत असून, प्राथमिक आरोग्य केंद्र सुलेमान देवळा केंद्राचा कारभार राम भरोशे चालू आहे. रुग्णांना स्वच्छ पाणी देण्याचे पाणी फिल्टर जर कर्मचारी घरी वापरत असतील तर जनतेने न्याय मागायचा कोणाकडे हा ही मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. याविषयी जाब विचारण्यासाठी समाजसेवक परमेश्वर घोडके गेले असता, उद्धटपणाची वागणूक देत, कायद्यात तुम्हाला सुद्धा गुंतू अशी भूमिका कर्मचारी घेत आहेत. संबंधित पाणी फिल्टर नेहणाऱ्या कर्मचारांवर डॉक्टर शुभांगी पैठणे काय कारवाई करनार हे पाहणं अपेक्षित आहे. आरोग्य केंद्राची इमारत नवीन होणे अपेक्षित असताना सुद्धा ति न होता. साहित्य गायब करण्यास कर्मचारीसह गावातील जिम्मेदार नागरिक सक्रिय झाले आहेत.नविन ईमारत बांधकाम होण्यासाठी आमरण उपोषण करणाऱ्यारे श्री. परमेश्वर घोडके वर जर ही वेळ येने खूप खेदांची गोष्ट आहे.

## कार्यकारी अभियंता तोंडेना नोटीस!

बीड दि.३० (बातमीदार): सार्वजनिक बांधकामं विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे यांना जिल्हाधिकारी यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. राज्यपाल यांच्या दौऱ्यात कसूर केल्याप्रकरणी ही नोटीस देण्यात आली असल्याचे समजते. महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांचा पंधरा दिवसापूर्वी बीड येथे दौरा झाला. राज्यपालसारख्या महत्वाच्या व्यक्ती जिल्हा दौऱ्यावर येतात तेव्हा सर्वच अधिकारी, कर्मचारीयांच्यावर ठराविक जबाबदारी असते. राधाकृष्णन हे बीड येथे आले तेव्हा त्यांच्यासाठी शासकीय विश्रामगृह येथे व्यवस्था करण्यात आली होती. मात्र या व्यवस्थेत अनेक त्रुटी होत्या. राज्यपाल यांना भेटण्यासाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी जी आसन व्यवस्था केली गेली होती त्यात अक्षम्य चुका होत्या. ही बाब लक्षात आल्यानंतर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे यांना कारणे दखावा नोटीस बजावली असल्याचे समजते.

## छाननीनंतर जिल्ह्यातील ६ जागासाठी ३७७ उमेदवार

बीड दि.३० (बातमीदार): २०२४ विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सहा मतदारसंघात छाननीमध्ये ३३ उमेदवारांचे अर्ज बाद झाले असून आज ३७७ उमेदवार राहीले आहेत. विधानसभेसाठी दाखल झालेल्या उमेदवारांच्या अर्जाची आज छाननी आज प्रत्येक मतदारसंघात संपन्न झाली. आज छाननीमध्ये (कंसात बाद अर्ज) गेवराई मतदारसंघात ४६ (३), माजलगाव ९८ (८), बीड ९० (५), आष्टी ५२ (३), केज ४३ (४), आणि परळी ४८ (१०) असे जिल्ह्यात एकंदर ३७७ उमेदवार शिल्लक राहीले आहेत. आज ३३ उमेदवारांचे अर्ज विविध कारणानी बाद ठरले आहेत. आता ४ नोव्हेंबट पर्यंत उमेदवारी मागे घेता येणार आहे. त्यानंतरच निवडणुकीतील प्रतक्ष उमेदवाराचे चित्र स्पष्ट होईल

| कोठे किती अर्ज राहिले | |
|---|---|
| गेवराई | ४६ |
| माजलगाव | ९८ |
| बीड | ९० |
| आष्टी | ५२ |
| केज | ४३ |
| परळी | ५९ |
| एकूण | ३७७ |

## दिपावली निमित्त ओतूर येथे बळीराजा मिरवणूकीचे आयोजन.

संतोष पडवळ - प्रतिनिधी जुन्नर (पुणे) ता ३० : दिवाळी पाडवा म्हणजेच बलिप्रतिपदेला येत्या शनिवारी 2 नोव्हेंबरला ओतूर ( ता. जुन्नर, पुणे ) येथे बळीराजाच्या भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात येणार आहे. सत्यशोधक समाज व भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठानच्या वतीने यावेळी विविध पारंपारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. ओतूर नवीन एसटी बस स्थानक ते पांढरी मारूती मंदिर व्यासपीठ अशी भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

मिरवणुकीत शिवकालीन साहसी कौशल्य दाखवणारे पथक. पारंपारिक वाद्य पथके, महिला लेझीम पथक, झांज पथक, वारकरी दिंडी पथक, भजनी व टाळ पथक, महाराष्ट्राची संस्कृती जपणारे बलुतेदार यांच्यासह अनेक आकर्षण असणार आहे. याच बरोबर बळीराजांची प्रतिकृती बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात येणार असून. याच बरोबर कुलदैवते खंडोबा, भैरोबा, ज्योतिबा, सातआसरा, भवानी माता, विठोबा रुखमाई, इतर संत तसेच स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय प्रतिमांचा सहभाग असणार आहे. शेतकऱ्यांचे कैवारी सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, सत्यशोधक समाजातील तत्कालीन खंदे समर्थक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील, महाधट पानसरे, तसेच इतर सत्यशोधकांच्या प्रतिमांचा मिरवणुकीत सहभाग असणार आहे. याचबरोबर व्यासपीठावर दानशूर सामाजिक कार्यकर्ते रमेश डुंबरे यांच्या हस्ते बळीराजा प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रम आणि शेतकऱ्यांचा राजा बळीराजाचे स्मरण व महत्त्व सांगणारे व्याख्यानाचे आयोजन करण्यात येणार आहे.

बलीप्रतिपदेला औक्षण करताना " इडा पीडा टळूदे...बळीचं राज्य येऊ दे " असे म्हटले जाते. यासंदर्भात बळीराजाची महती सांगण्यात येणार आहे. सदर आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे हे पहिलेच वर्ष असून शेतकऱ्यांनी यात भरभरून सहभाग घ्यावा असे आवाहन भाऊ कोंडाजी पाटील प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# माझ्या कार्यकाळात मतदार संघासाठी केलेले विकास कामेच मला पुन्हा आमदार करणार

केज (प्रतीनिधी) सध्या निवडणुकीचे वारे जोरदार वाहत असून महायुती महविकासआघडी चे उमेदवार आप आपल्या ताकतीने आपले नशीब अजमावत आहेत. मात्र केज मधे सध्या या दोन्ही उमेदवारांपेक्षा केज मधे माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांच्यावर मतदारांनी विश्वास दाखवल्याने सध्या तरी मतदार संघात त्यांच्या नावाची चर्चा पाहवयास मिळत आहे. सध्या निवडणुकीचे पडघम वाजले आहेत महायुती महविकास आघाडी सह अन्य पक्षांनी आपले आपले उमेदवारी अर्ज दाखल के ले आहेत. त्यात केज विधानसभा मतदार संघात माजी आमदार संगीता ताई विजय प्रकाश ठोंबरे यांनी 2014 ते 2019 या काळात के लेल्या विकास कामांच्या जोरावर आपले अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल के ले आहे. त्यांच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी केज विधानसभा मतदार संघातील नेकनूर पासून ते आं बेजोगाई पर्यंत विविध विकासकामे के लेली आहे त्यात नेकनूर येथील एसटी महामंडळाचे



बस स्टॅन्ड केज येथील महामंडळाचे बस स्टँड तसेच पंचायत समितीचे इमारत कोर्टाची इमारत केज येथील पोलीस स्टेशनची इमारत त्याच प्रकारे केज मध्ये संत भगवान बाबा यांच्या नावाने सभागृह त्याच प्रकारे आं बेजोगाई येथील एसटी महामंडळाची भव्य दिव्य अशी इमारत सह अन्य कामे त्यांनी के ले आहेत. या विविध विकास कामांच्या जोरावर त्यांनी आपला अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल के ला आहे उमेदवारी अर्ज दाखल के ल्यापासून विधानसभा

## संगिता ठोंबरे यांना मिळत आहे मतदारांचा पूर्ण पाठिंबा

मतदारसंघातून त्यांच्याकडे लोकांची भेटण्यासाठी गर्दी होताना दिसून येत आहे आमच्या प्रतिनिधीने त्यांच्याशी बातचीत के ली असता. त्यांनी मी के लेले विकास कामे मला निवडून देणार आहे मी कोणतेही पक्षाची नसून जनता हाच माझा पक्ष आहे आणि जनता माझ्या पाठीमागे ठामपणे उभे आहे. त्यामुळे मी शंभर टक्के निवडून येणार हा मला विश्वास आहे मतदारसंघात मी अनेक विकासकामे के ली आहेत प्रत्येक जाती धर्मातील लोकांना मी कधी पण परक्याची वागणूक दिली नाही मी कधी कोणाचे कामे अडवले नाहीत मी प्रत्येक गावात प्रत्येक समाजाला काही ना काही आणि ती दिलेला आहे . एखाद्या गावात मी काही दिले नसले तरी सध्याच्या लोकप्रतिनिधींसारखे सर्वसामान्यांची कामे तरी अडवली नाहीत असे त्या बोलत होत्या येणाऱ्या काळात मांजरा धरणात तीन टीएमसी पाणी आणण्यासाठी आणि मतदारसंघ सुजलाम सुफलाम होण्यासाठी मला जिंकू न यायचे आहे असेही त्या बोलत होत्या त्यामुळे त्यांना सध्या तरी मतदारसंघाच्या मतदारांचा कौल असल्याचे दिसून येत आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४
पान क्रं - ४ PAGE NO 4

# पवारांनी टाकलेले फासे त्यांच्याच उमेदवारांच्या गळ्यात अडकणार?





बीड जिल्ह्यातील सगळ्याच मतदार संघातील इच्छुकांना शरद पवार यांनी पक्षात प्रवेश दिला. त्यांना आपल्याला तिकीट मिळेल अशी आशा होती मात्र शरद पवार यांनी त्यांना टाळले. अशा सगळ्या नेत्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला असून, त्याचा परिणाम जिल्ह्यातील शरद पवार यांनी दिलेल्या उमेदवारांवर होणार आहे. राजकीय लोकांसह जनतेमध्येही शरद पवार यांच्या विरोधात नकारात्मक वातावरण पसरल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुका लागल्या असून २० नोव्हेंबरला मतदान होत आहे. नामनिर्देश पत्र भरून झाले असून आता अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बीड जिल्ह्याचा विचार करता सहा विधानसभेसाठी ५०० हून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये महाविकास आघाडी, महायुती यांच्यासह इतर पक्षांचे उमेदवार आहेत आणि बाकीचे अपक्ष म्हणून अर्ज दाखल झालेले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुती या महत्त्वाच्या गटामध्ये तीन–तीन पक्ष समाविष्ट आहेत. यामुळे जागा वाटप करताना बरेच अडथळे आले शिवाय जागा वाट्याला आल्यानंतर उमेदवार निवडण्यातही त्या त्या पक्षाला अडचणी आल्या. त्यामुळे अनेकांनी बंडखोरी केल्याचे सगळ्याच पक्षात दिसत आहे. राज्याप्रमाणे बीड जिल्ह्याची परिस्थितीही अशीच आहे. जिल्ह्यामध्ये शरद पवार राष्ट्रवादी आणि अजित पवार राष्ट्रवादी सोबतच भाजप अशी मुख्य लढत होताना दिसत आहे. मोठ्या राजकीय पक्षांची एकमेकांशी युती झाल्याने निवडणूक अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत उमेदवार निश्चिती करणे अवघड गेले. बीडमध्ये तर हे प्रकर्षाने जाणवले. जागा एक आणि इच्छुकांची संख्या भलीमोठी त्यामुळे असा प्रश्न निर्माण झाला. यामुळे आष्टी सारख्या ठिकाणी महायुतीला दोन दोन उमेदवार द्यावे लागले. महायुतीत असलेल्या अजित पवार यांना जिल्ह्यामध्ये पाच जागा मिळाल्या तर भाजपला दोन जागा मिळाल्या. यामध्ये आष्टी येथे दोघांचेही उमेदवार आहेत. महाविकास आघाडीकडून शरद पवार यांना पाच तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला गेवराईची एक जागा मिळाली. अजित पवार यांना उमेदवारांची निश्चिती करताना बीड सोडता इतर ठिकाणी अडचणी आल्या नाही. शरद पवार यांच्यासाठी मात्र मोकळे मैदान असल्याने त्यांनी अनेकांना गळाला लावण्याचा प्रयत्न केला. महायुती मधील पक्षाला जागा कमी आणि इच्छुकांची संख्या जास्त असल्याने अनेक जण शरद पवारांच्या संपर्कात होते. शरद पवार यांनी नेहमीप्रमाणे आपल्या राजकीय चाली खेळायला सुरुवात केली आणि जिल्ह्यामध्ये प्रत्येक मतदारसंघात संभ्रमाचे वातावरण तयार केले.

## अर्ज छाननीत 10 जणांचे अर्ज झाले बाद

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या परळी विधानसभेच्या मैदानात आज अर्ज छाननी झाल्यानंतर दहा जणांचे अर्ज बाद झाले तर 48 उमेदवार सध्या मैदानात आहेत. यातही विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे तब्बल वीस अल्पसंख्यांक उमेदवारांनी शड्डू ठोकला आहे. याची जोरदार चर्चा होत असली तरी चार नोव्हेंबर नंतरच खरे चित्र स्पष्ट होईल. येत्या 20 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या परळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी 58 उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र परळीचे निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांच्याकडे दाखल के ले होते. या 58 उमेदवारांच्या उमेदवारी अर्जाची आज बुधवारी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात छाननी झाली. छाननी दरम्यान दहा उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वेगवेगळ्या कारणाने अवैध ठरविण्यात आले तर 48 उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. नामनिर्देशन पत्र अवैध ठरलेल्या मध्ये एजाज इनामदार, अलका सोळंके , करुणा मुंडे, शंकर चव्हाण, अन्वर पाशा शेख व आवेसोदीन जलीलमिया सिद्दिकी, दत्ता किसन दहिवाळ, श्रीकांत चंद्रकांत पाथरकर, रमेश फड यांच्या अर्जाचा समावेश आहे .दत्ता दहिवाळ व श्रीकांत पाथरकर यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल के ला होता. या मतदारसंघातून अभिजीत देशमुख यांना मनसेने अधिकृ त उमेदवारी जाहीर के ली होती परंतु त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी रणांगणातून माघार घेतल्याची घोषणा के ली आहे. त्यामुळे मनसेच्या वतीने दत्ता दहिवाळ व श्रीकांत पाथरकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल के ला होता. या दोघांचे ही उमेदवारी अर्ज वेगवेगळ्या कारणाने अवैध ठरले तसेच करुणा मुंडे यांनी स्वराज्य शक्ती सेनेच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल के ला होता. त्यांचाही उमेदवारी अर्ज अवैध ठरला आहे. भारतीय जवान किसान पार्टीचे शंकर चव्हाण यांचाही नामनिर्देशन पत्र अवैध ठरवीण्यात आले आहे तसेच इतर अपक्षांचे असे मिळून दहा नामनिर्देशन पत्र अवैध ठरल्याचे कळविण्यात आले आहे. तर वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रामध्ये महायुतीचे उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे धनंजय पंडितराव मुंडे , महाविकास आघाडीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस (श.प )पार्टी चे उमेदवार राजेसाहेब श्रीकिशन देशमुख, अपक्ष उमेदवार राजश्री धनंजय मुंडे, जयवंत विठ्ठलराव देशमुख ,राजेभाऊ फड ,प्रभाकर वाघमोडे ,प्रमोद बिडगर, दिलीप बिडगर ,भारतीय प्रजा सुराज्य पक्षाचे उमेदवार धनराज अनंतराव मुंडे यांच्यासह चाळीस उमेदवारांचे अर्जाचा समावेश आहे. परळी विधानसभा मतदार संघात 58 उमेदवारांनी 72 उमेदवार अर्ज दाखल के ले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी परळी विधानसभा मतदारसंघाचे चित्र स्पष्ट होणार आहेत

## दिवाळी

आला दिवाळीचा हा सण,
मोकळे करू अंतरीचे मन,
गाभाऱ्याच्या मिठीत लपून,
उमगलेल्या कळ्यांना जपून!!१!!

दिवाळी प्रकाशाचा उत्सव,
दिवे पेटवून करू दीपोत्सव,
प्रकाशाच्या दिव्या बरोबर,
सद्गुणांचा बांधूया तोरण!!२!!

नव नवीन चीरगूट लेवूनी,
फाटलेल्या मनाला शिवूनी,
द्वेषभावना किनार फेकुनी,
बंधु-प्रेम आप-सात ठेवुनी!!३!!

चहू बाजूंनी करू स्वच्छता,
मांगल्याची टाकुनी अक्षता,
विषमता रूढ कणा कणात,
समानता पेरू क्षणा क्षणात!!४!!

आत्मचिंतनाची आतिशबाजी,
करू लहान-मोठे बाबा-आजी,
नव रंगांनी रंगवलेली रांगोळी,
एकात्मतेचे रंगात गावू
ओळी!!५!!

अजय शिवराम गणविर
बृ.मनपा
शिक्षक

## भारतीय किसान सभेचा मोहन जगताप यांना जाहिर पाठिंबा जिल्ह्यातील मविआच्या उमेदवारांना होणार मोठा फायदा

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तुतारीचे उमेदवार मोहनराव जगताप व महायुतीचे प्रकाश सोळंके यांच्यातील लढत चांगलीच रंगतदार होण्याच्या मागे असून आज तालुक्यातील नित्रुड येथे भारतीय किसान सभेने तुतारीचे उमेदवार मोहनराव जगताप यांना जाहिर पाठिम्बा दिला.हा पाठिम्बा जिल्हास्तरावर दिला असून याचा मोठा फायदा जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांना होणार आहे.

बुधवारी तालुक्यातील नित्रुड या ठिकाणी झालेल्या भारतीय किसान सभेच्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये भारतीय किसान सभेच्या वतीने महाविकास आघाडीच्या जिल्ह्यातील सर्व उमेदवारांना



जाहीर पाठिंबा दिला.यावेळी माजलगाव विधानसभेचे तुतारीचे उमेदवार मोहनराव जगताप तसेच परळी विधानसभेचे उमेदवार राजेसाहेब देशमुख,भारतीय किसान सभेचे कॉम्रेड अजयजी बुरांडे (मा.क.प.जिल्हा सचिव),कॉ. बब्रुवानजी पोटभरे (मा.क.प.सदस्य), कॉ. दत्ताकाका डाके (सरपंच नित्रूड),कॉ. कांशीराम सिरसाट, कॉ. मुरलीधर नागरगोजे (किसान सभा जि. सचिव),कॉ. डॉ.अशोक थोरात,कॉ. मनिषा करपे,कॉ. मिरा शिंदे,कॉ.सुदाम शिंदे (पं.स. सदस्य),कॉ.सय्यद रज्जाक,कॉ. गंगाधर पोटभरे (मा.क.प.सचिव परळी



),कॉ.मुसद्दीक बाबा सर (मा.क.प. सचिव),कॉ.सुहास झोडगे, कॉ. रोहिदास जाधव (मा.क.प.जि. सदस्य),कॉ.लहू खारगे (मा.क.प.वडवणी),कॉ.संदीपान तेलगड (पं.स. सदस्य),कॉ.सुभाषराव डाके (चेअरमन से.सह.सो.नित्रूड) यांच्यासह पदाधिकारी,कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

भारतीय किसान सभेच्या पाठींबा देण्यामुळे महाविकास आघाडीची ताकद वाढली आहे. भारतीय किसान सभेची माजलगाव तालुक्यात मोठी ताकद असून याचा मोठा फायदा माजलगाव विधानसभेचे उमेदवार मोहनराव जगताप यांना होण्याची शक्यता दिसून येत आहे. या बैठकीत महाविकास आघाडीला जाहीर पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला गेला, ज्यामुळे आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीला भारतीय किसान सभेची मजबूत साथ मिळणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com